जिल्हा परिषद सेवेत पुनःस्थापित,करणे बाबत.
(श्री.काळे सचिन बाळकृष्ण सेवा निलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत एकनाथवाडी पंचायत समिती पाथर्डी )

अहिल्यानगर जिल्हा परिषद
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्रमांक /ग्रांप३/ई.क्रमांक १०९०९०६
दिनांक ०१ / ०४ /२०२५

संदर्भ:- १.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निप्रआ ११११/प्र.क्र.८६/११-अ दिनांक १४ ऑक्टोबर २०११

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील क्र निप्रआ१११२ प्र.क्र.८२/११-अ दिनांक २०/०४/२०१३

३.या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रांप- ३/१७३/२०२० दिनांक १२/०२/२०२२

४.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रांप-३/३५२/२०१८ दि.१८/०४/२०१८

५.मा.सहायक आयुक्त ( चौकशी) नाशिक विभाग नाशिक चौकशी अहवाल खाचौ/सी.आर/३०२/२०१८ दिनांक १९/१२/२०१८

६. या कार्यालयाचे अंतिम कारणे दाखवा नोटीस साप्रवि-२/ग्रांप३/१८-२०१९/४१३/२२ दि.०२/०५/२०२२ ( सेवेतुन बडतर्फ करणे नोटीस)

७.मा.विभागीय आयुक्त नाशिक यांना सादर केलेला अहवाल कार्यालयाचे पत्र साप्रवि-२/ग्रांप-३/६६९/२०२३ दिनांक ११/०९/२०२३ (मा.न्यायनिर्णयाचे अधिन राहून सेवेत पुन:स्थापित करणे अभिप्राय पत्र)

८ मा.सदस्य सचिव ,विभागीय निलंबन आढावा समिती तथा उपर आयुक्त )महसुल ( नाशिक विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्र.मशा/पुनस्था -२०२४प्र.क्र.८/ई-८ दिनांक २७/०८/२०२४

संदर्भ क्रमांक ०३ च्या आदेशान्वये श्री.काळे सचिन बाळकृष्ण सेवा निलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत एकनाथवाडी पंचायत समिती पाथर्डी यांना ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन केल्याने त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले आहे.

संदर्भ क्रमांक ०४ चे ज्ञापनान्वये श्री. काळे सचिन बाळकृष्ण तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांना गैरवर्तनाचे दोषारोप पत्र १ ते ४ बजावणेत आले आहे.

संदर्भ क्रमांक ०७ अन्वये श्री.काळे सचिन बाळकृष्ण सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा मा.न्यायनिर्णयाचे अधिन राहून जिल्हा परिषत सेवेत पुन:स्थापित करणे चा प्रस्ताव अभिप्रायासह निलंबन आढावा समिती नाशिक यांचे कडे सादर करण्यात आलेला होता.

संदर्भ क्रमांक ०८ अन्वये मा. सदस्य सचिव विभागीय निलंबन आढावा समिती दिनांक ०९/१२/२०२४ रोजी झालेल्या निलंबन आढावा समितीचे बैठकीत नियुक्ती प्राधिकारी यांचे अभिप्राय,आरोपांचे स्वरुप विचारात घेता श्री.काळे सचिन बाळकृष्ण ग्रामसेवक यांना मा.न्यायनिर्णयाचे व विभागीय चौकशीच्या अधिन राहून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थपीत करण्यात यावे असा निर्णय सर्वानुमते घेतला असल्याचा आदेश पारित केला आहे.

१) सदर कर्मचा-यास पुर्ननियुक्ती देतांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील पत्रक्र निप्रआ १११२ प्र.क्र.८२/११-अ दिनांक २०/०४/२०१३ मधील खालील सुचनांनुसार अकार्यकारी पदावर नियुक्ती दयावी.

अ) राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या मुळ महसुली विभाग (Division) व ज्या पदावर कार्यरत असतांना निलंबित केले तो महसुल विभाग वगळुन अन्यत्र अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.

आ)विभागीय संवर्गातील कर्मचा-यांना पुनःस्थापित करतांना त्यांच्या मुळ जिल्हा व ज्या जिल्हयात कार्यरत असतांना निलंबित केले तो जिल्हा वगळुन अन्य जिल्हयात अकार्यकारी पदावर नियुक्ती द्यावी.

ई)जिल्हा संवर्गीय कर्मचा-यांना पुनःस्थापित करतांना त्यांचा मुळ तालुका व ज्या तालुक्यात कार्यरत असतांना निलंबित केले असेल तो तालुका वगळून अन्य तालुक्यात अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.

२) त्यांचे वरील फौजदारी केस सबंधी कामकाजावर त्यांचा दबाव येणार नाही. तसेच त्या विशिष्ठ प्रकरणात त्यांचेवर आरोप ठेवण्यात आले आहे .त्या प्रकरणाशी त्यांचा दुरान्वयेही संबधी येणार नाही अशा ठिकाणी नियुक्ती दयावी.

३) नियुक्ती अधिकारी यांनी त्यांचे नियुक्ती आदेशाची प्रत विभागीय आयुक्त नाशिक यांना आग्रेषित करावी.

सबब संदर्भ क्र.३ अन्वये श्री. काळे . सचिन बाळकृष्ण तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन आदेश रद्द करण्यात येत असुन या आदेशान्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेत वरिल अटी व शर्तीच्या अधिन राहुन तसेच मा.न्यायालय निर्णया चे अधिन राहुन ग्रामपंचायत अधिकारी या पदावर पंचायत समिती ----- नेवासा येथे सेवेत पुनःस्थापित करण्यात येत आहे. सबब त्यांना लहान ग्रामपंचायतीचा पदभार देण्यात यावा.

उक्त सेवेत पुनःस्थापित करण्याचे आदेशाची नोंद श्री. काळे सचिन बाळकृष्ण ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. व तसा अहवाल सादर करावा.सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.gov.in या सकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक.................... असा आहे.
२०२५०४०१०६००३४

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 15:43:37
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. काळे सचिन बाळकृष्ण सेवा निलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत एकनाथवाडी पंचायत समिती पाथर्डी सध्या मुख्यालय पंचायत समिती अहिल्यानगर
व्दारा- गट विकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर /शेवगाव

प्रत- गट विकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर
२/- सदरचा आदेश श्री.काळे सचिन बाळकृष्ण सेवा निंलबीत ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावणेत येवून दिनांकीत स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करणेत यावी.

प्रत-गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा
२/- श्री. काळे सचिन बाळकृष्ण हजर झालेनंतर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत-मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक कार्यालय
प्रत-मा.सचिव ,विभागीय निलंबन आढावा समिती तथा विभागीय आयुक्त यांना माहितीस्तव सादर
प्रत-मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी ,जिल्हा परिषद अहिल्यानगर